**प्रसिध्दी पत्रक** दिनांक:-21/01/2021

**१) हनुमंत अशोक सरडे, सहायक अभियंता २) श्रीकांत हिम्मत साळुंखे, सिनीअर टेक्नीशीयन शहापुर महावितरण नळदुर्ग ग्रामीण ३) इंद्रजीत बाबुराव शिंदे, ऑपरेटर (कंत्राटी) शहापुर ३३ केव्ही ४) अमित दशरथ उंबरे, ट्रान्सफर दुरुस्ती शासकीय गुत्तेदार (आयुष ट्रान्सफॉर्मर इंजिनिअरींग, उस्मानाबाद) यांनी 55000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | १) हनुमंत अशोक सरडे, सहायक अभियंता २) श्रीकांत हिम्मत साळुंखे, सिनीअर टेक्नीशीयन महावितरण नळदुर्ग ग्रामीण ३) इंद्रजीत बाबुराव शिंदे, ऑपरेटर (कंत्राटी) शहापुर ३३ केव्ही ४) अमित दशरथ उंबरे, ट्रान्सफर दुरुस्ती शासकीय गुत्तेदार (आयुष ट्रान्सफॉर्मर इंजिनिअरींग, उस्मानाबाद) |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.21.01.2021 रोजी एमआयडीसी उस्मानाबाद येथे आयुष ट्रान्सफॉर्मर इंजिनिअरींग ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती वर्कशॉपमध्ये |
| तपासी अधिकारी | श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 55000/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | मौजे शहापुर येथील तक्रारदार यांचे शेताशेजारील शेताच्या बांधावर असलेला सार्वजनिक इलेक्ट्रीक ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याने तो बदलुन देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेतकरी असुन मौजे शहापुर शिवारातील मधुकर जाधव यांचे शेताचे बांधावर असलेल्या सार्वजनिक ईलेक्ट्रीक ट्रान्सफर नादुरुस्त झाल्याने तो बदलुन देण्यासाठी महावितरण कंपनी नळदुर्ग ग्रामीण १) हनुमंत सरडे, सहायक अभियंता २) श्रीकांत हिम्मत साळुंखे, सिनीअर टेक्नीशीयन महावितरण नळदुर्ग ग्रामीण यांनी सहायक अभियंता यांच्यासाठी १५०००/- रु ची मागणी केली होती तक्रारदार यांना त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.20.01.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.अशोक हुलगे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.20.01.2021 रोजी इंद्रजीत शिंदे, ऑपरेटर यांनी हनुमंत सरडे, सहायक अभियंता यांच्यासाठी १५०००/- रु लाचेची मागणी केली त्यानंतर हनुमंत सरडे, सहायक अभियंता यांनी वरील नमुद कामासाठी ५०००/- रु लाचेची मागणी केली व श्रीकांत हिम्मत साळुंखे, सिनीअर टेक्नीशीयन शहापुर यांनी लाचेसाठी प्रोत्साहन दिल्याचे व दि. 21.01.2021 रोजी अमित उंबरे ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती शासकीय गुत्तेदार यांनी 55000/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि.21.01.2021 रोजी सापळा आयोजीत केला असता अमित दशरथ उंबरे, ट्रान्सफर दुरुस्ती शासकीय गुत्तेदार यांनी एमआयडीसी उस्मानाबाद येथील त्यांचे स्वत:चे आयुष ट्रान्सफॉर्मर इंजिनिअरींग ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती वर्कशॉपमध्ये तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 55000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक व त्यांच्या पथकाने मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-** dysposmanabad@gmail.com

Scanned with CamScanner